PANCHAVATI EXPRESS
A WEEKLY NEWSPAPER

# स्टार हेल्थचे नाशिकमध्ये पहिल्या विभागीय कार्यालयाची स्थापना

नाशिक (पंचवटी एक्सप्रेस): भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (NSE: STARHEALTH, BSE: 543412) ने नाशिक येथे आपल्या पहिल्या विभागीय (झोनल) कार्यालयाचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. महाराष्ट्रातील वेगाने विकसित होत असलेल्या टियर २ आरोग्य विमा बाजारपेठांपैकी एक असलेल्या नाशिक मधील कंपनीची गुंतवणूक या माध्यमातून अधिक दृढ झाली आहे. ग्राहकांना स्थानिक स्तरावर अधिक सुलभ सेवा उपलब्ध करून देणे, आरोग्यसेवा भागीदारांना सहाय्य करणे, दाव्यांच्या निराकरण प्रक्रियेला गती देणे आणि या भागातील स्टार हेल्थच्या विस्तृत सल्लागार नेटवर्कशी अधिक प्रभावी संवाद साधणे या उद्देशाने हे नवीन कार्यालय सुरू करण्यात आले आहे. स्टार हेल्थ इन्शुरन्सचे बिझनेस हेड श्री विजय अरोरा यांच्या हस्ते झोनल ऑफिसचे उद्घाटन करण्यात आले.विस्तार होत असलेल्या आरोग्यसेवा परिसंस्थेमुळे नाशिक हे स्टार हेल्थसाठी प्राधान्याचे बाजारपेठीय केंद्र बनले आहे. वाढती आरोग्यजागरूकता, खाजगी आरोग्यसेवेची वाढती मागणी, वाढते वैद्यकीय खर्च आणि विस्तारत असलेले कॅशलेस हॉस्पिटल नेटवर्क यांमुळे आरोग्य विम्याचे महत्त्व अधिक वाढले आहे.स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्सचे पूर्णवेळ संचालक श्री. हिमांशु वालिया म्हणाले 'नाशिक हे महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित होर्णाया टियर २ आरोग्य विमा बाजारांपैकी एक आहे. वाढती आरोग्यजागरूकता, वाढते वैद्यकीय खर्च आणि शहरातच दर्जेदार



उपचारांना मिळणारे वाढते प्राधान्य या घटकांमुळे हा विकास होत आहे. नाशिकमधील आमचे पहिले झोनल कार्यालय हे या महत्त्वाच्या बाजारपेठेतील ग्राहक, रुग्णालये, सल्लागार आणि समुदायांच्या अधिक जवळ राहण्याच्या आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे.'

महाराष्ट्रात आर्थिक वर्ष २६ दरम्यान स्टार हेल्थने २,३०० कोटी रु. पेक्षा अधिक मूल्याच्या दाव्यांचे निराकरण केले असून ३.५ लाखांहून अधिक जणांना विमा संरक्षण दिले आहे. यामुळे राज्यातील कुटुंबांसाठी विश्वासार्ह आरोग्य विमा भागीदार म्हणून आमची भूमिका अधिक दृढ झाली आहे. आरोग्य विमा अधिक सुलभ, सोपा आणि विश्वासार्ह बनविण्यासोबतच आरोग्य सेवा केंद्रासारख्या उपक्रमांद्वारे प्रतिबंधात्मक आरोग्यसेवालाही आम्ही अधिकबळकटी देत राहू.□हा बदल आता प्रत्यक्ष स्तरावरही दिसून येत आहे. कॉर्पोरेट रुग्णालये, विशेषज्ञ क्लिनिक्स आणि नर्सिंग होम्स यांच्या पाठबळामुळे नाशिकमधील अधिकाधिक नागरिक शहरातच दर्जेदार आरोग्यसेवा घेण्यास प्राधान्य देत आहेत.